जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४०७ दिनांक - ०३/०६/२०२३

### येरवडा पोलिस स्टेशन पुणे शहर

### वाहन चोरी करणारा गुन्हेगार येरवडा तपास पथका कडून जेरबंद

येरवडा परिसरात एक संशयीत इसम ॲक्टीव्हा गाडी घेवून फिरत असलेबाबत बातमीदारामार्फत बातमी मार्शलचे अंमलदार संदिप जायभाय,सागर दळवी व तपास पथकाचे अंमलदार दत्तात्रय शिंदे यांना मिळाल्याने सदरची माहिती मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती वरुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे अंमलदार यांनी तेथे जावून संशयीत इसमास पळून जात असताना अतिशय शिताफीने पकडले.सदर इसमाचे ताब्यात एक होंडा ॲक्टीव्हा मोटारसायकल मिळून आल्याने सदर गाडीबाबत येरवडा पोलीस स्टेशनला खात्री केली असता येरवडा पो स्टे गु र नं १०६/२०२३ भादवि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल असल्याने सदर गुन्हयात त्यास अटक करुन तपासादरम्यान त्याचे ताब्यातील मोटारसायकलबाबत येरवडा येथून चोरी केल्याचे कबूल केले आहे.तसेच वडगावशेरी येथून एक सेंट्रो कार चोरी केल्याचे कबूल केले आहे.सदर बाबत येरवडा पो.स्टे. येथे गु.र.नं.३१०/२०२३ भादवि ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे.असे एकूण २ गुन्हे उघडकीस आणले असून ८५,०००/- रु च्या दोन गाडया हस्तगत करण्यात आल्या आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,श्री.किशोर जाधव वपोनि येरवडा,श्री.बाळकृष्ण कदम,पोनि गुन्हे,येरवडा श्री.जयदिप गायकवाड,यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि अंकुश डोंबाळे,श्रेणी पोउपनि प्रदिप सुर्वे,पोहवा गणपत थिकोळे,दत्ता शिंदे,तुषार खराडे,पोना किरण घुटे,अमजद शेख,सागर जगदाळे,कैलास डुकरे,प्रविण खाटमोडे,पोअं अनिल शिंदे,राहुल परदेशी,सुरज ओंबासे,दत्तात्रय शिंदे,सुशांत भोसले,प्रशांत कांबळे,अश्विन देठे,संदिप जायभाय,सागर दळवी यांनी केलेली आहे.

